15 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा नवतंत्रज्ञानाकडे ओढा

## दीक्षांत समारंभ विशेष : ५० हजार विद्यार्थी घेणार पदवी

पोपट पवार
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा भागवत त्यांना ज्ञानामृत देणाऱ्या शिवाजी विद्यापीठाचा येत्या सोमवारी ६१ वा दीक्षान्त समारंभ होत आहे. १९६४ मध्ये १०१४ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करणारे हे विद्यापीठ २०२३ मध्ये ५० हजार विद्यार्थ्यांना पदव्या देणार आहे. गेल्या साठ वर्षांतील विद्यापीठाची ही वाटचाल देदीप्यमान राहिल्याचे हे द्योतक आहे.

सुरुवातीला विद्यापीठ कार्यक्षेत्रात असणारे रत्नागिरी व सोलापूर हे दोन जिल्हे कमी झाले तरी विद्यापीठाची विद्यार्थिसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जागतिक स्पर्धेत आपला विद्यार्थी टिकला पाहिजे, या हेतूने विद्यापीठाने पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबरच नव-तंत्रज्ञानाचीही कास धरली आहे. त्यामुळे नवे अभ्यासक्रम स्वीकारतानाच प्रशासकीय कामातही नव्या तंत्रज्ञानाने सुसूत्रता आणली आहे.

परीक्षा विभागातील सर्व कामकाज ऑनलाइन करण्यापासून ते वेळेआधी निकाल लावणे, नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, प्रत्येक विद्यार्थिनीला वसतिगृहात प्रवेश, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील प्रत्येक महाविद्यालयाचे अकॅडेमिक ऑडिट करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यापर्यंतचा प्रवास विद्यापीठाने साधला आहे.

### संशोधनाला चालना

विद्यापीठाच्या स्थापनेपासून विद्यापीठात संशोधनकार्य सुरू झाले. पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र या विज्ञानशाखेतील विषयांमध्ये संशोधन कार्यासाठी प्रयोगशाळा सुरू झाल्या. त्या-त्या विभागातील शिक्षकांनी आपले संशोधन निबंध जागतिक दर्जाच्या संशोधन पत्रिकांमधून प्रकाशित केले आहेत.

### तेरा कुलगुरूंची लाभली कारकिर्द

डॉ. अप्पासाहेब पवार हे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू. त्यांच्याच कार्यकाळात विद्यापीठाची घडी बसवण्यात आली. त्यानंतर बॅ. पी. जी. पाटील, बी. एस. भणगे, आर. के. कणबरकर, के. भोगीशयना, के. बी. पोवार, ए. टी. वरुटे, डी. एन. धनागरे, एम. जी. ताकवले, एम. एम. साळुंखे, एन. जे. पवार, देवानंद शिंदे व विद्यमान कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह १३ कुलगुरू आतापर्यंत विद्यापीठाला लाभले आहेत.



| | |
|---|---|
| २९६ महाविद्यालये | २.८१ विद्यार्थी |

| | | |
|---|---|---|
| ११ अध्यासन केंद्रे | २५ केंद्रे | ३४ अधिविभाग |

### व्यावसायिक अभ्यासक्रमाची जोड

विद्यापीठात सुरुवातीला सहा अधिविभाग होते. सद्यःस्थितीला विद्यापीठात ३४ अधिविभाग आहेत. पारंपरिक अभ्यासक्रमापासून प्रारंभ केलेल्या विद्यापीठाने नव्या शिक्षणाची गरज ओळखून व्यावसायिक अभ्यासक्रमही सुरू केले. शिक्षणशास्त्र, विधी, व्यवस्थापन अभ्यासक्रमांच्या यशस्वी प्रयोगानंतर विद्यापीठाने तंत्रज्ञान अधिविभाग सुरू केला. पारंपरिक सिव्हिल व अन्न तंत्रज्ञानासारखी शाखा सुरू केली. तिला मोठी मागणी आहे.

गेल्या ६० वर्षांत विद्यापीठाने मोठी प्रगती केली आहे. पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या अकॅडमिक शिस्तीने ही घडी बसवली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण देण्याचे काम विद्यापीठ करत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.

- प्रा. डॉ. अशोक चौसाळकर
ज्येष्ठ विचारवंत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
15 DEC 2023

# विद्यापीठ परिसरात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी

## सोमवारी राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली दीक्षांत समारंभ : मंडप, बुक, खाद्यपदार्थांच्या स्टॉलची उभारणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवारी १८ रोजी राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (ए.आय.सी.टी.ई.) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर राजमाता जिजाऊ साहेब सभागृह, मंडप, ग्रंथ महोत्सवाचे स्टॉल, पदवी प्रमाणपत्र वाटप करण्यासाठीचे स्टॉल उभारले आहेत.

केंद्राच्या आदेशानुसार दीक्षांत समारंभाला कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा संचालक, अधिष्ठाता आणि प्रमुख पाहुण्यांनी पांढरा पायजमा व कुर्ता तर महिलांनी मोती कलरची साडी त्यावर मोरपंखी, जॅकेट परिधान करायचा आहे. या सर्व गोष्टींची संपूर्ण तयारी केली आहे. मंडप उभारला असून परीक्षा भवन परिसरात प्रत्येक शाखेनुसार पदवी प्रमाणपत्र वितरणाचे स्टॉल उभारले आहेत. ग्रंथ व खाद्य पदार्थांचे स्टॉल तयार केले आहेत. प्रशासनाकडून दीक्षांत समारंभासाठी ४० कमिट्या स्थापन करून कामे वाटून दिली आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी होणाऱ्या ६० व्या दीक्षांत समारंभासाठी मंडप उभारणी सुरू आहे. (छाया : रियाज ट्रेनर)

### पदवी प्रमाणपत्रांची छपाई अंतिम टप्प्यात

दीक्षांत समारंभात ४९ हजार ४३८ पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यंदा पदवी ग्रहण करणाऱ्या स्नातकांत २७ हजार ४७५ मुली आहेत. पदवी प्रमाणपत्रांची छपाई अंतिम टप्प्यात आहे.

### शनिवारी ग्रंथमहोत्सव

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर दोन दिवस अगोदर विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्यावतीने शनिवारी १६ रोजी सकाळी ७.३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीला प्रारंभ होईल. विद्यापीठात ग्रंथदिंडीची सांगता झाल्यानंतर १० वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. रविवारी १७ रोजी सकाळी ११ वाजता राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा 'स्वररंग' कार्यक्रम होणार आहे. ग्रंथ महोत्सवातील स्टॉल १६ ते १८ डिसेंबर पर्यंत रोज सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत खरेदीसाठी खुले राहणार आहेत.

15 DEC 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणपूरक घर, हवा प्रदूषणवर मंथन

## किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सव : पुरस्कारांचे आज वितरण

▶सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवामध्ये आज दुसऱ्या दिवशी बोटॅनिकल गार्डनला भेट देऊन सर्वांनी माहिती घेतली. वनस्पतीशास्त्र विभागाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी संयोजन केले. दिवसभरात विविध लघुपट, चित्रपट दाखवले. दरम्यान, उद्या (शुक्रवारी) लघुपट, चित्रपट प्रदर्शनाबरोबरच दुपारच्या सत्रात वसुंधरा सन्मान पुरस्काराचे वितरण होणार आहे.

महोत्सवात आज दिवसभरात शेती, मत्सशेती, पर्यावरणपूरक घर बांधणी, हवा प्रदूषण आदी विषयावर जगभरातील लघुपट, चित्रपट दाखवण्यात आले.

दुपारच्या सत्रात 'सर्क्युलर इकॉनॉमी अँड सस्टेनेबिलिटी' या विषयावर चर्चासत्र झाले. पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी पर्यावरण आणि सर्क्युलर इकॉनॉमी या विषयावर मांडणी केली. वेंगुर्ला नगरपरिषदेचे सहायक अधीक्षक वैभव म्हाकवेकर यांनी वेंगुर्ला शहराच्या शून्य कचरा संकल्पनेची यशकथा उलगडली. वेंगुर्ला शहरात शंभर टक्के कचरा संकलन करून त्याचे २७ प्रकारे वर्गीकरण करून त्याची कशा पद्धतीने निर्गत करते, याची माहितीही त्यांनी दिली. सुभाष नियोगी यांनी कचरा निर्गतीकरण आधुनिक तंत्रज्ञानाने कसे करता येते, याची माहिती दिली. डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले. शरद आजगेकर यांनी आभार मानले.




कोल्हापूर : किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवात गुरुवारी झालेल्या चर्चासत्रात डॉ. रसिया पडळकर, डॉ. आसावरी जाधव, वैभव म्हाकवेकर आणि सुभाष नियोगी.

### महोत्सवात आज...

- सकाळी आठ वाजता: विद्यापीठ परिसर फेरी, जलसंधारणाची कामे व पक्षी निरीक्षण
- दहा वाजता : लघुपट, चित्रपट प्रदर्शन
- दुपारी तीन वाजता : वसुंधरा सन्मान पुरस्कार वितरण व पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांचे व्याख्यान

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2023
पुढारी

# वसुंधरा महोत्सवात विद्यार्थी, नागरिकांनी केली बोटॅनिकल गार्डनची सफर

कोल्हापूर : वसुंधरा महोत्सवमध्ये गुरुवारी सकाळी शाळेचे विद्यार्थी व नागरिकांनी विद्यापीठातील बोटॅनिकल गार्डनची सफर केली. संशोधक विद्यार्थ्यांनी लीड बोटॅनिकल गार्डनची माहिती दिली. शिवाजी विद्यापीठात वसुंधरा महोत्सव सुरू आहे. दि. १४ रोजी सकाळी १०.३० वाजता फिल्म स्क्रिनिंग झाले. यामध्ये शेती, मत्स्यशेती, पर्यावरणपूरक घरबांधणी, हवा प्रदूषण अशा विविध विषयांवर देशी-परदेशी फिल्म्स दाखवण्यात आल्या. दुपारच्या सत्रात मसक्युलर इकॉनॉमी अँड 'सेनेबिलिटी' विषयावर चर्चासत्र झाले. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी मार्गदर्शन केले. वेंगुर्ला नगर परिषदेचे सहायक अधीक्षक वैभव म्हाकवेकर यांनी वेंगुर्ला शहराच्या शून्य कचरा संकल्पनेची यशस्वी कथा सांगितली. वेंगुर्ला शहर शंभर टक्के कचरा संकलन करून त्याचे २७ प्रकारे वर्गीकरण करून त्याची कशा पद्धतीने निर्गत करते, याची माहिती त्यांनी दिली. सूत्रसंचालन डॉ. रसिया पडळकर यांनी केले. शरद आजगेकर यांनी आभार मानले. दरम्यान, शुक्रवारी सकाळी ८ वाजता विद्यापीठ परिसर फेरी, जलसंधारणाची कामे व पक्षी निरीक्षण, त्यानंतर १० वाजता सिनेमा चित्रीकरण, दुपारी ३ वाजता वसुंधरा सन्मान व पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांचे व्याख्यान होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2023
पुण्यनगरी

# वृक्षवैभव पाहून बालचमू अचंबित

## विद्यापीठातील बोटॅनिकल गार्डनची सफर : वसुधंरा चित्रपट महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवमध्ये गुरूवारी दुसऱ्या दिवशी बोटॅनिकल गार्डनची सफर घडविण्यात आली. सकाळी ६ ते ९.३० यावेळेत विविध शाळेच्या विद्यार्थ्यांना व उपस्थित नागरिकांना बॉटनी विभागाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी लीड बोटॅनिकल गार्डनची माहिती दिली. हे वृक्षवैभव पाहून बालचमू अचंबीत झाले.

महोत्सवामध्ये सकाळी १०.३० वाजता फिल्म स्क्रिनिंग सुरु झाले. यामध्ये शेती, मत्सशेती, पर्यावरण पूरक घर बांधणी, हवा प्रदूषण असे विविध विषयावर देशी - परदेशी लघुपट दाखवण्यात आले. दुपारच्या सत्रात 'सरक्यूलर इमॉनमी अ‍ॅण्ड सस्टीनॅबीलीटी' या विषयावर पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी मांडणी केली. त्यानंतर वेंगुर्ला नगरपरिषदेचे सहाय्यक अधिक्षक वैभव म्हाकवेकर यांनी वेंगुर्ला शहराच्या शून्य कचरा संकल्पनेची यशस्वी कथा सादर केली. त्यानंतर सुभाष नियोगी मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन डॉ. रसिया पडळकर यांनी केले. आभार शरद आजगेकर यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2023
सकाळ

# कोल्हापूरकरांनी पाहिला 'उल्कावर्षाव'

## बुधवारपर्यंत संधी ; तासाला ५० ते ६० उल्का पडत असल्याचे निरीक्षण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : सर्वात मोठा आणि नेत्रदीपक असा उल्कावर्षाव पाहण्याचा आनंद आज कोल्हापुरातील खगोलप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिकांनी लुटला. त्यासाठी त्यांनी आकाश निरीक्षणाचे नियोजन केले होते.

मध्यरात्री दोन वाजता साधारणतः १०० ते १२० एवढ्या उल्कांचा वर्षाव मिथुन राशीतून होण्याची शक्यता गृहीत धरून अनेकांनी आकाश निरीक्षण करण्याचे निश्चित केले होते. रात्री एकनंतर आकाश निरभ्र होण्यास सुरुवात झाली आणि तासाला साधारणपणे ५० ते ६० इतक्या उल्का पडतानाचे निरीक्षण नोंदवण्यात आले. हा उल्कावर्षाव साध्या डोळ्यांनी पाहण्याचा आनंद सर्वांनी घेतला. रात्री ८ वाजून ३० मिनिटापासून ते पहाटे ५ वाजून ३० मिनिटांपर्यंत मिथुन राशीतून होणारा उल्कावर्षाव बुधवार (ता. २०) पर्यंत पाहता येईल, असे शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी सांगितले.

सर्वसाधारणपणे उल्कापात हा पृथ्वी जेव्हा धूमकेतूच्या पट्ट्यातून जाते, तेव्हा आपल्याला दिसतो. मात्र, मिथुन राशीतून होणार उल्कावर्षाव हा धूमकेतूमुळे नसून ३२०० फेथॉन या लघुग्रहामुळे होणारा उल्कावर्षाव आहे. हा लघुग्रह मंगळ आणि गुरू ग्रहांच्या कक्षांच्या दरम्यानच्या लघुग्रहांच्या पट्ट्यातील एक असा लघुग्रह आहे. या लघुग्रहापासून जे धुळीचे कण निर्माण होतात आणि त्याच्यातून पृथ्वी भ्रमण करते, तेव्हा दरवर्षी डिसेंबरमध्ये मिथुन राशीतून उल्कावर्षाव पाहता येतो. जेव्हा हे धुळीचे कण पृथ्वीच्या वातावरणामध्ये प्रवेश करतात तेव्हा त्यांचे वातावरणामधील हवेशी घर्षण होते आणि ते पेट घेतात.

त्यावेळी १० ते १५ सेकंदापर्यंत आपल्याला ते दिसू शकतात. साधारणतः पृथ्वीपासून १२० ते ८० किलोमीटरच्या दरम्यान त्यांचे ज्वलन होते. त्यावेळीच त्यांचा वेग ताशी ११ ते ७२ किलोमीटर सेकंद इतका असतो. त्यानंतर त्यांचे राखेत रूपांतर होते. त्यातील काही मोठ्या आकाराच्या उल्का संपूर्णपणे न जळता जमिनीपर्यंत पोहचतात, असे डॉ. व्हटकर यांनी सांगितले.



कोल्हापूर : पन्हाळा येथे शिवाजी विद्यापीठाने साकारलेल्या अवकाश संशोधन केंद्रात १२ इंची दुर्बिणीद्वारे अवकाश निरीक्षण करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2023
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अविष्कार संशोधन स्पर्धेत विजेतेपद स्विकारल्यानंतर प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया यांच्याबरोबर विद्यार्थी.

# अविष्कार संशोधन स्पर्धेत भारती विद्यापीठ विजेते

**कोल्हापूर :** राज्यपाल यांच्या संकल्पनेतून संशोधनाला चालना देण्यासाठी सुरू केलेल्या शिवाजी विद्यापीठ अविष्कार संशोधन स्पर्धेत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीने विजेतेपद पटकावले. फार्मसी कॉलेजने सर्व विभागातून सहा पारितोषिके मिळवली आहेत.

विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेत यश संपादीत विद्यार्थी असे : पदवी विभाग तृतीय कमांक मोहम्मद पटवेगार (मेडीसीन ॲन्ड फार्मसी), पदव्युत्तर विभाग प्रथम क्रमांक मिहीर वैद्य (इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी), पदव्युत्तर विभाग प्रथम क्रमांक रसीका पाटील (मेडीसीन ॲन्ड फार्मसी) पदव्युत्तर विभाग व्दितीय क्रमांक रूतिका पाटील (मेडीसीन ॲन्ड फार्मसी), पीएचडी विभाग व्दितीय क्रमांक प्रणाली टकले (इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी), पीएचडी विभाग तृतीय कमांक रूतुजा चौगुले (मेडीसीन ॲन्ड फार्मसी). या स्पर्धेचे मुख्यसमन्वयक म्हणून रविंद्र जरग यांनी काम पाहीले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया, प्रा. रविंद्र जरग यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व विद्यार्थ्यांनाा माजी मंत्री डॉ. विश्वजीत कदम, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. एच. एम. कदम, डॉ. अस्मिता जगताप संचालक, भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेस पुणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. भाटीया, प्रा. रविंद्र जरग, यांनी अभिनंदन केले.

15 DEC 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या सोमवारच्या परीक्षा स्थगित

। कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शिवाजी विद्यापीठाचा पदवीदान समारंभ सोमवारी (दि. १८) आहे. त्यामुळे या दिवशीच्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

या दिवशीच्या परीक्षांच्या नवीन तारखा संकेतस्थळावर जाहीर करण्यात आल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २० ऑक्टोबरपासून सुरू आहेत. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाचा ६०वा पदवीदान समारंभ सोमवारी होणार आहे. या पदवीदान सोहळ्याला विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांची उपस्थित असणार आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी विद्यापीठ प्रशासनाकडून सुरू आहे. दरम्यान, सोमवारी पूर्वनियोजित असलेल्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या दिवशीच्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध केले आहे.

गुरुवारी विविध नऊ अभ्यासक्रमांची परीक्षा झाली. यासाठी एकूण १ हजार ५५४ विद्यार्थी उपस्थित होते. तर, दिवसभरात १८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. गरुवारअखेर १८५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2023
तरुण भारत

# विद्यापीठ दीक्षांतनिमित्त १८ डिसेंबरची परीक्षा स्थगित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ १८ डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे १८ डिसेंबररोजी होणाऱ्या



विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युतरच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. या परीक्षांचे सुधारीत वेळापत्रक यथावकाश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची महाविद्यालय, अधिविभाग आणि विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

- **सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द होणार**

शिवाजी विद्यापीठ ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील परीक्षांचे वेळापत्रक यापुर्वीच प्रसिध्द झालेले आहे. महामहिम राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या आदेशानुसार १८ डिसेंबर रोजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ होणार आहे. त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेवून १८ डिसेंबर रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. यासंदर्भातील माहिती महाविद्यालयांना व अधिविभागांना परिपत्रकाव्दारे देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी पत्रक प्रसिध्द केले आहे. तरी याची दखल विद्यार्थ्यांसह सर्व संबंधीत घटकांनी घ्यावी, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2023
पुढारी

# हिवाळी सत्र परीक्षांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे आजअखेर सुमारे १८५ निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनीस्ट्रेशन, बॅचलर ऑफ अॅग्रीक्चलर, मास्टर ऑफ आटर्स, मास्टर ऑफ सायन्स (टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमाची परीक्षा झाली. परीक्षेला १ हजार ५५४ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १४ रोजी एम.एस्सी. इन्फॉर्मेशन अँड टेक्नॉलॉजी, बीएसडब्ल्यू, एम.एस्सी. डेटा सायन्स, बी.ए., बीएड., एम.एस्सी.(शुगर टेक्नॉलॉजी), एम.ए.(हिंदी) आदी १८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. आजअखेर १८५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2023
पुण्यनगरी

# यसबा करंडक सोहळा उद्या

कोल्हापूर : माजी सिनेट सदस्य चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या पाचव्या स्मृतीदिन निमित्त शनिवारी (दि. १६) शिवाजी विद्यापीठ आणि भालकर फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय कला महोत्सव यसबा करंडकचे आयोजन करण्यात आले आहे. भाषा भवन येथे होणाऱ्या या करंडकच्या दुसऱ्या पर्वात ५५० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यसबा करंडक हा बालरंगभूमी चळवळीचा एक भाग बनला आहे. सकाळी ९ ते ५ या वेळेत मातीकाम, चित्रकला, निबंध, मुकनाट्य, एकपात्री, समूह गीत, समूह नृत्य या कलाप्रकारात विद्यार्थ्यांची स्पर्धा रंगणार आहे. तसेच सामाजिक, सांस्कृतिक व बालरंगभूमी यासाठी योगदान देणारे नाट्यकर्मी प्रशांत जोशी यांना यसबा बालमित्र पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन कलाप्रेमी दिपक मिरजे, डॉ. संदिप इंचनाळकर, साहित्यिक पी. जी. कुलकर्णी, संचालक, विद्यार्थी विकास विभाग संचालक पी. टी. गायकवाड हे करतील तर बक्षीस समारंभ कुलगुरू दिगंबर शिर्के, प्र कुलगुरु प्रमोद पाटील, कुलसचिव विलास शिंदे यांच्या उपस्थितीत होईल, अशी माहिती संदिप भालकर, सपना जाधव, संग्राम भालकर, यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2023
लोकमत

# नाइट कॉलेजमध्ये 'मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम'

कोल्हापूर : मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी कोल्हापुरातील नाइट कॉलेजच्या मराठी विभागाच्या वतीने बुधवारपासून एक महिन्याचा 'मोडीलिपी प्रमाणपत्र कोर्स' सुरू होणार आहे. शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त या कोर्समध्ये मोडी लिपीचे वाचन व लेखन यांचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. नाइट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ या वेळेत कोर्स होणार आहे. प्रवेशासाठी इयत्ता १०वी उत्तीर्ण असावे. इच्छुकांनी बुधवारपर्यंत मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्र. प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले.